पीकसंरक्षण

# मक्यावरील लष्करी अळीचे नियंत्रण




**डॉ. सोपान साळुंके**
(मो.नं. ७९७२५७०४१९)
**प्रा. अमोल बाजड**
कृषी महाविद्यालय, बाभूळगाव, येवला, जि. नाशिक




> लष्करी अळी खूप नुकसानकारक ठरते. या किडीचे वयस्क शक्तिशाली असून ते एका रात्रीत जवळपास १०० किलोमीटरपर्यंत प्रवास करू शकतात. या सोबतच या किडीची प्रजननक्षमता जास्त आहे. मादी तिच्या आयुष्यात सुमारे १ ते २ हजार अंडी घालू शकते. हा कीटक समूहाने हल्ला करतो, त्यामुळे काही दिवसांतच पीक समूळ नष्ट होते. याकरिता नियंत्रणाचे प्रभावी उपाय आवश्यक ठरतात.

लष्करी अळी (फॉल आर्मी वर्म) हा एक बहु-शाकाहारी कीटक आहे, जो ८० हून अधिक पिकांवर हल्ला करतो. परंतु मका हे त्याचे सर्वाधिक पसंतीचे पीक आहे. भारतात पहिला प्रादुर्भाव जुलै २०१८ मध्ये कर्नाटक राज्यात दिसून आला. आजपर्यंत या किडीचा प्रादुर्भाव आंध्र प्रदेश, तामिळनाडू, ओडिशा, गुजरात, महाराष्ट्र, बिहार, छत्तीसगड आणि बंगाल या राज्यांमध्ये आढळून आला आहे.

लष्करी अळी खूप नुकसानकारक ठरते. या किडीचे वयस्क शक्तिशाली असून ते एका रात्रीत जवळपास १०० किलोमीटरपर्यंत प्रवास करू शकतात. या सोबतच या किडीची प्रजननक्षमता जास्त आहे. मादी तिच्या आयुष्यात सुमारे १ ते २ हजार अंडी घालू शकते. हा कीटक समूहाने हल्ला करतो, त्यामुळे काही दिवसांतच पीक समूळ नष्ट होते.

**अंडी** : रात्रीच्या वेळेस सामान्यतः अंडी पानांच्या खालच्या पृष्ठभागावर दिली जातात. पोटाच्या शेवटच्या भागावर असलेल्या केसांच्या संरक्षक थराने अंडी झाकलेली असतात. अंडी ०.४ मि.मी. एवढी असून आकाराने गोलाकार असतात. अंडी हलकी, पिवळी, हिरवी आणि तपकिरी रंगाची असतात. एक प्रौढ मादी तिच्या संपूर्ण जीवनकाळात सुमारे दोन हजार अंडी घालण्याची क्षमता ठेवते. अंड्यांचा कालावधी २-३ दिवसांचा असतो.

**अळी** : अंड्यातून बाहेर येणारी छोटी अळी ही हलक्या पिवळ्या रंगाची असते. अळी जशी मोठी होत जाते तसा रंग हिरवा, पिवळा, तपकिरी आणि काळा होत जातो. परंतु बहुतेक अळ्या या हिरवट पिवळ्या रंगाच्या असतात. प्रौढ अळीचा रंग हलका तपकिरी ते गडद तपकिरी असतो. पूर्णपणे वाढलेल्या अळीच्या डोक्यावर एक उलट्या 'ध' आकाराचे चिन्ह असते. अळीच्या बाजूकडील पृष्ठभागावर ३ पिवळ्या रंगाच्या रेषा आढळतात. अळी अवस्था स्थानिक पर्यावरणानुसार १२ ते २० दिवसांची असते.

**कोषावस्था** : कोषावस्था ७ ते ३५ दिवसांची असते. या अवस्थेत जमिनीत माती आणि रेशमापासून ककून बनवले जाते आणि त्यामध्ये कोषावस्था पूर्ण होते.

**पतंग (प्रौढ) कीटकाची ओळख** : या किडीचा पतंग तंबाखूच्या अळीच्या पतंगासारखा दिसतो. पंख पसरल्यावर पंखाची रुंदी ३ ते ४ सें.मी. होते. पुढचे पंख गडद तपकिरी आणि काळ्या रंगाचे असतात. नर पतंगाच्या पुढच्या पंखांच्या वरच्या काठावर पांढरे डाग स्पष्ट दिसतात. पतंग (प्रौढ) २-३ आठवडे जगतात.

**नुकसानीची पद्धत** : अंड्यातून बाहेर आलेली लहान अळी पानांचा हिरवा भाग खरवडून खाते. मोठी अळी पाने कुरतडून खाऊन नुकसान करते. अळी झाडांच्या पोंग्यामध्ये लपलेली असते. जेव्हा पाने उघडतात तेव्हा त्यावर गोल-गोल छिद्रे दिसतात आणि अळ्यांची विष्ठा देखील पानांवर स्पष्टपणे दिसते.

कीड व्यवस्थापन : एकात्मिक कीड नियंत्रण पद्धतीचा अवलंब याप्रमाणे करावा.

१. उन्हाळ्यामध्ये खोलगट नांगरणी करावी.

२. पेरणी वेळेवर करावी, उशिरा पेरलेल्या पिकावर कीटकांचा प्रादुर्भाव जास्त होतो.

३. मक्यासोबत तूर, मूग, उडीद इत्यादी पिके आंतरपिके म्हणून घ्यावीत.

४. फ्युजिपर्डा फेरोमोन ट्रॅप १५/ हे. लावावेत.

५. टी (T) आकाराच्या ३०-४० खुंट्या प्रतिहेक्टरी लावाव्यात. ६. अंड्यांचे गुच्छ आणि अळी इत्यादी हाताने वेचून नष्ट करावीत. ७. पेरणीपूर्वी बियाण्याला फोर्टिन्झा कीटकनाशक औषधीची ४ मि.लि./ किलो बियाणे या दराने प्रक्रिया करावी यामुळे पीक १४-२५ दिवस सुरक्षित राहील. ८. NSKE ५ % किंवा नीम तेल १५०० PPM/ ५ ml ची फवारणी करावी.

